**SAMTANAGAR POLICE STATION**

Opp Western Express Highway, Kandivali (East), Mumbai

022 - 28876119

E-mail: ps.samtanagar.mum@mahapolice.gov.in

---

दि. 13/08/2026

## नामांकीत कंपनीच्या दुधात भेसळ करुन भेसळयुक्त दुधाची विक्री करणाऱ्या इसमांस अटक केलेबाबत

समतानगर पोलीस ठाणे हद्दीत इसम नामे ईरन्ना लिंगय्या गोपनाबोनई, वय 48 वर्ष. रा. रामउजागर चाळ, लक्ष्मीनगर, दामुनगर लास्ट बस स्टॉप, कांदिवली पुर्व, मुंबई हा त्याचे राहत्या घरात नामांकीत कंपनीचे दुधात भेसळ करुन सदर भेसळयुक्त दुधाची तो ग्राहकांना विक्री करणार आहे अशी माहिती मिळाल्याने दिनांक 12/08/2026 रोजी सकाळी 05.50 वाजता समतानगर पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने त्याचे राहत्या घरावर छापा टाकला असता तो अमुल व गोकुळ या नामांकीत कंपन्यांच्या 1 लिटर व अर्धा लिटरच्या दुधाच्या पॅकेट मधे अशुद्ध पाण्याची भेसळ करताना रंगेहात मिळुन आल्याने त्याच्यावर गुरन 1071/2026, BNS कलम 274, 345(3), 347(1), 318 (4), 336 (3), 3 (5) सह कलम 26, 27, 31 शिक्षा कलम 59, व 63 अन्न सुरक्षा कायदा मानके कायदा 2006 नियम व नियमन 2011 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

छापा कारवाई दरम्यान आरोपीताचे ताब्यात अमुल व गोकुळ कंपनीचे 74 लिटर भेसळयुक्त दुध मिळुन आले असुन भेसळ करण्यासाठी लागणारे साहित्य तसेच अमुल व गोकुळ कंपनीच्या नावाच्या बनावट रिकाम्या पिशव्या मिळुन आल्या आहेत. आरोपीतास गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी माननीय अप्पर पोलीस आयुक्त उत्तर प्रादेशिक विभाग श्री शशिकुमार मीना सो, मा. पोलीस उपआयुक्त उत्तर परिमंडळ 3 श्री गजानन शिवलींग राजमाने सो, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, समतानगर विभाग, श्री कैलास बर्वे सो, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री जयवंत शिंदे, पोलीस निरीक्षक धंनजय कावडे, सहाय्यक पोलिस निरीक्षक योगेश राऊत, सहाय्यक पोलस निरीक्षक रघुनाथ भोये, स.फौ. रोजश तोंडवाळकर, पोह जयेश केणी, पोह अतुल ननवरे, पो.शि. दौलत साळुंके, पो.शि. निलेश भिकले, पोशि अशोक गाढवे यांनी केली आहे.